# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
## पोलीस भरती - २०१७

क्रमांक आस्था-३(१)/पो.भ.-२०१६/मैदानी चाचणी गुण प्रसिध्दी/२०१७, पुणे, दिनांक २४/०३/२०१७.

**पुण शहर पोलीस दलाच्या संकतेस्थळावर प्रसिध्दीसाठी.**

# उमेदवारांसाठी महत्वाची सुचना

**विषय :- पोलीस भरती-२०१७**
**उमेदवारांचे मैदानी चाचणीचे गुण प्रसिध्दी बाबत व**
**आक्षेप असल्यास ते २ दिवसांत सादर करण बाबत.**

---oo---

उपरोक्त विषयान्वये पोलीस भरती-२०१७ च्या प्रक्रियेमध्ये सहभागी झालेल्या सर्व उमेदवारांना सुचित करण्यांत येते की, मैदानी चाचणी मध्ये सहभाग घेतलेल्या उमेदवारांनी प्राप्त केलेले गुण पुणे शहर पोलीस दलाच्या संकेतस्थळावर व पोलीस मुख्यालय येथील कवायत मैदानावरील फलकावर मैदानी चाचणी संपल्यानंतर दैनंदिन प्रसिध्द करण्यांत येत आहेत.

सदरच्या प्रसिध्द करण्यांत आलेल्या गुणांबाबत काही आक्षेप असल्यास, संबंधीत उमेदवारांने त्यांचे आक्षेप सदरची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द झाल्यापासून २ दिवसांत शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथील पोलीस भरती कार्यालय (ग्रीन रुम) येथे सादर करावी. विहीत मुदतीनंतर आलेल्या आक्षेप/अर्जाचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही याची सर्व उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

( अरविंद चावरिया )
सदस्य पोलीस भरती समिती-२०१७ तथा
पोलीस उपआयुक्त,मुख्यालय-१,पुणे शहर

प्रति,

पोलीस निरीक्षक, संगणक विभाग, पुणे शहर
२/- वर नमूद पत्र तातडीने पुणे पोलीस संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

प्रत :- प्रभारी अधिकारी, ग्रीन रुम.
२/- उमेदवारांचे मैदानी चाचणीतील प्रसिध्द केलेल्या गुणांबाबत, उमेदवारांचे काही लेखी आक्षेप आल्यास, त्याबाबत आपल्याकडील मुळ गुणपत्रक / व्हीडीओ क्लीपची पडताळणी करुन, दुरुस्ती असल्यास, ती पोलीस भरती समितीच्या निदर्शनास आणुन द्यावी. व त्यांच्या मान्यतेनंतर व आदेशाप्रमाणे पुढील उचित कार्यवाही करावी. या संदर्भात स्वतंत्र रजिष्टर ठेवून, त्यामध्ये योग्य त्या नोंदी घेवून, त्या ग्रीन रुम इन्चार्ज यांनी साक्षांकित कराव्यांत.